www.sahyandrinews.com

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १८० • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.१ एप्रिल २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## इंडिया आघाडीची एकत्र येत दिल्लीत 'लोकतंत्र बचाव महारॅली'

# निवडणुकीपूर्वी मोदी मॅच फिक्स करत आहेत-खा.राहुल गांधी






**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**–मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर दिल्ली मद्य धोरण गैरव्यवहारप्रकरणी झालेल्या अटेकच्या कारवाईविरोधात इंडिया आघाडीने आज (३१ मार्च) एकत्र येत दिल्लीत 'लोकतंत्र बचाव महारॅली' काढली. या रॅलीच्या माध्यमातून विरोधी पक्षांनी सत्ताधारी भाजपावर जोरदार टीका केली. या रॅलीत देशभरातील २८ पक्ष सहभागी झाले होते. यावेळी बोलताना काँग्रेस नेते, खासदार राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर मॅच फिक्सिंगचा गंभीर आरोप केला. तसेच लोकसभा निवडणुकीच्या आधी काँग्रेसचे बँक खाते बंद केले जातात, ही मॅच फिक्सिंग असल्याचे राहुल गांधी यांनी म्हटले आहे.



सध्या आयपीएलच्या मॅच सुरु आहेत. पण चुकीच्या पद्धतीने पंचावर (अंपायर) दबाव टाकून खेळाडूंना विकत घेतले जाते, कर्णधाराला घाबरवून मॅच जिंकल्या जातात. त्याला क्रिकेटमध्ये मॅच फिक्सिंग म्हणले जाते. आता आपल्या पुढे लोकसभेच्या निवडणुका आहेत. मग पंच (अंपायर) कोणी निवडले? पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निवडले. त्यानंतर मॅच सुरू होण्याच्या आधीच आमच्या दोन खेळाडूंना अटक करत तुरुंगात टाकले. त्यामुळे या निवडणुकीत नरेंद्र मोदी मॅच फिक्सिंग करण्याचा प्रयत्न करत आहेत. नरेंद्र मोदी यांनी दिलेला ४०० पारचा नारा हा ईव्हीएम आणि माध्यमांवर दबाव टाकून देखील १८० च्या पुढे जाणार नाही, असे राहुल गांधी यांनी म्हटले.

लोकसभा निवडणुकीपूर्वी काँग्रेस पक्षाचे बँक खाते बंद करण्याची कारवाई करण्यात आली आहे. यावर बोलताना राहुल गांधी म्हणाले, काँग्रेस पक्ष देशातील सर्वात मोठा विरोधी पक्ष आहे. मग देशातील सर्वात मोठा विरोधी पक्ष असलेल्या पक्षाचे सर्वच्या सर्व खाते बंद केले गेले. आम्हाला लोकांना विविध ठिकाणी प्रचारासाठी पाठवायचे आहे. आम्हाला प्रचाराची मोहीम सुरू करायची आहे. बॅनर्स लावायचे आहेत. पण आमचे सर्व स्रोत बंद केले गेले आहेत. मग ही निवडणूक कशी होत आहे? नेत्यांना धमकावले जात आहे, पैसे देऊन सरकार पाडले जात आहेत. अनेक नेत्यांना जेलमध्ये टाकले जात आहे. केजरीवाल यांना तुरुंगात टाकले. हेमंत सोरेन यांनाही अटक केली, त्यामुळे हा सर्व मॅच फिक्सिंगचा प्रयत्न सुरू आहे, असा गंभीर आरोप राहुल गांधी यांनी यावेळी केला.ही मॅच फिक्सिंग फक्त पंतप्रधान नरेंद्र मोदी हे करत नसून भारतातील सर्वात मोठे तीन-चार उद्योगती करत आहेत. ही मॅच फिक्सिंग का होत आहे? तर याचे एक कारण असून भारताचे संविधान बदलण्याचा प्रयत्न या माध्यमातून होत आहे. ज्या गरिबांना संविधानाने हक्क दिले, त्याच संविधानाला संपविण्यासाठी ही मॅच फिक्सिंग करण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा खळबळजनक आरोप राहुल गांधी यांनी भाजपावर केला.

## मतदारांवर दबाव किंवा धमकाविण्याचे प्रकार आढळल्यास त्वरीत माहिती द्या-निवडणूक निरीक्षक जाटव

### राजकीय पक्ष व उमेदवारांच्या प्रतिनिधींची आढावा बैठक



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर लोकसभा मतदार संघासाठी आता एकूण १५ उमेदवार रिंगणात असून कुठेही मतदारांवर प्रत्यक्ष -अप्रत्यक्ष दबाव किंवा धमकाविण्याचे प्रकार आढळल्यास त्याची माहिती त्वरीत द्यावी, असे आवाहन सामान्य निवडणूक निरीक्षक लोकेशकुमार जाटव यांनी केले.

राजकीय पक्ष व उमेदवारांच्या प्रतिनिधींना निवडणूक प्रक्रियेची माहिती देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात रविवारी आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी श्री. जाटव बोलत होते. बैठकीला निवडणूक खर्च निरीक्षक हेमंत हिंगोनिया, कायदा व सुव्यवस्था निवडणूक निरीक्षक सुजीत दास, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी व इतर अधिकारी आणि राजकीय पक्षांचे / उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित होते.यावेळी श्री. जाटव म्हणाले, जिल्ह्यात किंवा चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाच्या ज्या क्षेत्रात मतदारांवर दबाव टाकणे किंवा धमकाविण्याचे प्रकार निदर्शनास येत असतील, त्याची माहिती त्वरित कळवावी. जेणेकरून अशा क्षेत्रात पोलिसांसह अतिरिक्त मनुष्यबळाचे व्यवस्थापन करता येईल. तसेच धमकाविणा-यांवर कडक कारवाईसुध्दा केली जाईल. निवडणुकीच्या काळात नागरिकांना किंवा अन्य कोणालाही तक्रार करावयाची असल्यास सी-व्हीजील पचा उपयोग करावा. या पवर तक्रार आणि फोटो अपलोड केल्यास १०० मिनिटांमध्ये त्याचे निराकरण करता येते. निवडणुकीच्या संदर्भातील ऑनलाईन परवानगी करीता 'सुविधा' प विकसीत करण्यात आले आहे. उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी सुविधा पचा वापर करावा. ऑफलाईन परवानगीकरीता 'एक खिडकी' योजनासुध्दा उपलब्ध आहे, असे सामान्य निवडणूक निरीक्षक श्री. जाटव यांनी सांगितले.तर खर्च निरीक्षक श्री. हिंगोनिया म्हणाले, पूर्ण निवडणूक प्रक्रियेदरम्यान कोणताही उमेदवार, राजकीय पक्ष किंवा संघटन १० हजार रुपयांपेक्षा जास्त रोख रकमेचा खर्च करू शकत नाही. यापेक्षा जास्त खर्च करावयाचा असल्यास ऑनलाईन किंवा धनादेशाद्वारे करता येईल. तसेच उमेदवारांनी आपल्या खर्चाच्या नोंदवह्या अतिशय अचूक भराव्यात. खर्चाच्या नोंदवहीची पडताळणी तीन वेळा करणे आवश्यक असून नोंदवहीत बाब निहाय खर्च रोज नमुद करावा, अशा सूचना श्री. हिंगोनिया यांनी दिल्या.सादरीकरण करतांना जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, संपूर्ण निवडणूक प्रक्रिया नि:ष्पक्ष आणि मुक्त वातावरणात पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी सर्व राजकीय पक्ष, उमेदवारांचे सहकार्य आवश्यक आहे. आदर्श आचारसंहितेच्या काळात 'काय करावे' किंवा 'काय करू नये', यबाबतही त्यांनी माहिती दिली. सोबतच २७ मार्च रोजी अंतिम झालेली मतदार यादी, ८५ वर्षावरील व दिव्यांग मतदारांना गृहमतदानाची सुविधा, टपाली मतदान, निवडणुकीसाठी पोलिस कर्मचा-यांची तैनाती व इतर मनुष्यबळ, जिल्हास्तरावर व विधानसभा मतदारसंघ स्तरावर मिळणा-या परवानग्या, ईव्हीएम व्हीव्हीपॅट सुरक्षा व्यवस्थापन, स्ट्राँग रुम, पेडन्यूज व जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण, उमेदवारांच्या खर्चाचे योग्य व्यवस्थापन आदींबाबत उमेदवारांच्या प्रतिनिधींना अवगत केले.

**असे आहेत संपर्क क्रमांक :**

**१.मतदार मदत केंद्र / नियंत्रण कक्ष – १९५० (टोल फ्री)**
**२.आदर्श आचार संहिता कक्ष – ८७८८५१००६१**
**३.एक खिडकी (सुविधा) कक्ष – ९६७३०४२६९०**
**४.सी–व्हीजील / ई.एस.एम.एस – पद्वारे**

## रश्मी बर्वेंना सर्वोच्च न्यायालयाचा झटका!

# जात पडताळणी प्रमाणपत्रावर तातडीने सुनावणीस नकार

**नागपूर । प्रतिनिधी**

रामटेक लोकसभा मतदारसंघातून महाआघाडीकडून उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्या काँग्रेसच्या रश्मी बर्वे यांचे जातवैधता प्रमाणपत्र जात पडताळणी समितीकडून रद्द करण्यात आले त्यामुळे त्यांचा लोकसभा निवडणुकीचा उमेदवारी अर्ज रद्द करण्यात आला त्यानंतर त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली पण न्यायालयाने जात पडताळणी प्प्रमाणपत्रावर तातडीने सुनावणीस नकार दिला.



आता सोमवारी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात या प्रकरणावर सुनावणी होणार आहे. त्यावरील निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. रश्मी बर्वे यांचा अर्ज बाद झाला असला तरी त्यांचे पती श्यामकुमार बर्वे रामटेकमधून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आहेत. रामटेक लोकसभा मतदारसंघातून महाआघाडीकडून उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्या काँग्रेसच्या रश्मी बर्वे यांचे जातवैधता प्रमाणपत्र जात पडताळणी समितीकडून रद्द करण्यात आले. त्यानंतर उमेदवारी अर्जही बाद ठरला. गुरुवारी सकाळी जात वैधता प्रमाणपत्र रद्द होताच बर्वे यांच्या वकिलांनी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेत तातडीने निर्णयाची विनंती केली होती.मात्र, उच्च न्यायालयाने तातडीने सुनावणी घेण्याची गरज नसल्याचे सांगून सोमवारची वेळ दिली. लोकसभा निवडणुकीसाठी निश्चित कार्यक्रमानुसार उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत शनिवारी दुपारपर्यंतच असल्याने बर्वे यांनी शुक्रवारीच सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले. त्याद्वारे उच्च न्यायालयाला तातडीने सुनावणी घेण्याचे निर्देश देण्याची विनंती केली.राज्य सरकारनेही या प्रकरणात कॅव्हेट दाखल करीत आपली बाजू सुरक्षित करून घेतली होती. सर्वोच्च न्यायालयानेसुद्धा या प्रकरणावर तातडीने सुनावणी घेण्यास नकार दिला. सोमवारी उच्च न्यायालयात या प्रकरणावर सुनावणी होणार आहे. त्यानंतर गरज असल्यास सर्वोच्च न्यायालयात येण्याची मुभा बर्वे यांना देण्यात आली आहे.

## खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीला आजीवन कारावास

**पोंभूर्णा । प्रतिनिधी**

पोंभूर्णा तालुक्यातील चेक नवेगांव येथील गुन्हेगार सासरा भुजंग झिटू कन्नाके (५७) याला चंद्रपूर जिल्हा सत्र न्यायालयाचे न्यायाधीश मा. काळे यांच्या न्यायालयाने दिनांक ३० मार्च रोजी आजीवन कारावासाची शिक्षा ठोठावली असून सोबतच ५००/– रूपयाचा दंड ठोठावला आहे. दंड न भरल्यास आणखी सहा महिण्याची शिक्षा असे देण्यात आलेल्या शिक्षेचे स्वरूप आहे.



दिनांक १२ एप्रिल २०२१ रोजी पोंभूर्णा तालुक्यातील चेक नवेगांव गावात सासऱ्याकडूनच सुनेचा खुन झाल्याची धक्कादायक घटना घडली होती. कौटुंबिक किरकोळ शाब्दिक भांडणाचे पर्यावसान मारहाणीत झाल्याने सुनेला आपला जीव गमवावा लागला होता. गिता दिपक कन्नाके (३२) असे मृतक महिलेचे नाव आहे. अंगणात खुनी सासरा व त्याच्या काहीच फुट अंतरावर मृतक गिता बसली होती. घरेलु शुल्लक कारणावरून सासरा भुजंग व गिता मध्ये शाब्दिक भांडण सुरू झाले होते. राग अनावर होऊन भुजंगने दगडी फरशीच्या तुकड्याने गिताच्या डोक्यावर व मानेवर वार केले, दवाखान्यात नेत असतांना रस्त्यातच तिचा मृत्यु झाला होता. पोंभूर्णा पोलीसांनी आरोपी भुजंग विरूद्ध अपराध क्रमांक ३७/२०२१,भादंवि कलम -३०२,नुसार खुनाचा गुन्हा दाखल करून तत्कालीन ठाणेदार धर्मेंद्र जोशी यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक ओलालवार यांनी तपास करून प्रकरण न्यायालयात पाठविले होते. याच खुन प्रकरणात जिल्हा सत्र न्यायालयाचे न्यायाधीश काळे यांनी दिनांक ३० मार्च २०२४ रोजी आरोपीला गुन्हेगार ठरवत आजीवन कारावासाची शिक्षा व ५००/– रूपयाचा दंड ठोठावला. दंड न भरल्यास आणखी सहा महिण्याची शिक्षा असा निकाल दिला आहे. सरकारच्या बाजूने सरकारी वकील सिमा रामटेके यांनी पैरवीचे काम पाहीले,तर पैरवी अधिकारी म्हणून पोंभूर्णा पोलीस स्टेशन चे पोलीस हवालदार सुधाकर तोडासे न्यायालयात उपस्थित राहीले.

## नक्षल्यांचा घातपाताचा डाव उधळला; छत्तीसगड सीमेवरील तळ उध्वस्त

**गडचिरोली (वृत्तसंस्था):** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात सक्रिय झालेल्या नक्षल्यांचा घातपात घडवून आणण्याचा डाव उधळून लावत गडचिरोली पोलिसांनी त्यांचा तळ उध्वस्त केला आहे. एटापल्ली व धानोरा तालुक्याच्या शेवटच्या टोकावर छत्तीसगड सीमेलगतच्या टेकडीवर नक्षल्यांनी तळ बनवला होता. पोलीस कारवाईची कुणकुण लागताच नक्षलवाद्यांनी पळ काढला. यावेळी परिसरातून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा व साहित्य जप्त केले.



लोकसभा निवडणुकीत घातपात घडविण्याच्या उद्देश्याने एटापल्ली आणि भामरागड तालुक्याला लागून असलेल्या छत्तीसगड सीमाभागात जवळपास दहा ते बारा जहाल नक्षलवादी सक्रिय झाले आहे. काही दिवसांपूर्वी रेपनपल्ली हद्दीत झालेल्या चकमकीत पोलिसांनी चार नक्षल्यांना कंठस्नान घातले होते. गुरुवारीदेखील छत्तीसगड सीमेवर मध्यरात्री सहा तास चकमक झाली. यानंतर २९ मार्चला पहाटे अहेरी तालुक्यातील अतिदुर्गम दामरंचा येथे अशोक तलांडी या आदिवासी तरुणाचा ताडगावजवळ गळा आवळून हत्या करत नक्षल्यांनी पत्रक टाकले होते.

# सर्व लढायांमध्ये सहभागी !

हजरत उस्मान यांच्या मृत्यूने मदिना शहरात संपूर्ण अराजकता आणि अराजकतेचे राज्य होते. पाच दिवसांच्या राजकीय भांडणानंतर इजिप्शियन बंडखोर गटाचा नेता इब्न सबा याने हजरत अलींच्या कारणाला पाठिंबा दिला कारण ते योग्य खलिफा होते. ज्यांच्या बाजूने पवित्र प्रेषित यांनी इच्छापत्र केले आहे. दि.२३ जून ६५६ एडी रोजी हजरत उस्मान यांच्या मृत्यूच्या सहा दिवसांनंतर हजरत अली यांना पवित्र प्रेषित यांचे चौथे उत्तराधिकारी म्हणून निवडण्यात आले आणि जनतेने त्यांच्या हातून एकेक करून निष्ठेची शपथ घेतली. हजरत अली हे पवित्र प्रेषित यांचे काका अबू तालिब यांचे पुत्र होते. पवित्र प्रेषित यांच्या जन्मानंतर सुमारे वीस वर्षांनी त्यांचा जन्म मक्का येथे झाला. जेव्हा हजरत अली यांचा जन्म झाला, तेव्हा पवित्र प्रेषित स्वतः त्यांचे पालक बनले, कारण त्यांच्या वडिलांची आर्थिक स्थिती अत्यंत कमकुवत होती.

हजरत अली पवित्र प्रेषित यांच्या पलंगावर थांबले होते, जेव्हा ते पवित्र प्रेषित मक्काहून मदिना सोडले होते. मेकन नेत्यांनी पवित्र प्रेषित यांना अटक करून ठार मारण्याची योजना आखली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा त्यांना पलंगावर पवित्र प्रेषित यांच्या ऐवजी हजरत अली आढळले तेव्हा ते संतप्त झाले. हजरत अली हे एक शूर आणि कुशल योद्धा होते. त्यांनी पवित्र पैगंबर यांचेसोबत जवळजवळ सर्व लढायांमध्ये भाग घेतला होता. हजरत अली यांचा विवाह हजरत फातिमा यांच्याशी झाला होता, पवित्र प्रेषित यांची ती मुलगी होती.

त्याच्या निवडीनंतर लगेचच हजरत अली यांनी मुस्लिम राज्याची राजधानी मदिना येथून इराकमधील कुफा येथे हलवली, जे अधिक मध्यवर्ती ठिकाण होते. त्यांच्या निवडीनंतर त्यांनी हजरत उस्मान यांच्या खुन्यांना ताबडतोब शिक्षा द्यावी, म्हणून हजरत तल्हा आणि हजरत जुबेर यांसारख्या पवित्र प्रेषितांच्या प्रभावशाली साथीदारांसह मुस्लिमांच्या लोकप्रिय मागणीचा सामना केला. हजरत अली यांनी जाहीर केले की, राज्यातील कायदा व सुव्यवस्था पुनर्संचयित करणे, हे त्यांचे सर्वोच्च प्राधान्य आहे आणि त्यानंतरच ते हजरत उस्मान यांच्या मारेकऱ्यांना न्याय मिळवून देऊ शकतील. परंतु हजरत तल्हा आणि हजरत जुबैर यांनी हजरत अली यांच्याशी सहमती दर्शवली नाही आणि सैन्य उभारण्यास सुरुवात केली. हजरत आयशा यांना वास्तविक परिस्थितीची जाणीव नव्हती, त्यांनीही हजरत तल्हा आणि हजरत जुबैर यांनाही मारेकऱ्यांना शिक्षा करण्याच्या प्रयत्नात सामील केले. तिघांनी एक लहानसे सैन्य बसराच्या दिशेने नेले. हजरत अली यांनी लढाई आणि रक्तपात टाळण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले, परंतु त्यांचे सर्व प्रयत्न अयशस्वी ठरले. दुर्दैवाने, त्याच्या सैन्यात आणि हजरत



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.

आयशा यांच्यातील सैन्यामध्ये एक लढाई झाली. तथापि, हजरत तल्हा आणि हजरत जुबैर यांनी युद्धापूर्वीच आपले सैन्य सोडले आणि इतर काही विरोधकांनी त्यांना ठार केले. हजरत आयशा यांच्या सैन्याचा पराभव झाला, परंतु हजरत अली यांनी तिला योग्य आदर दिला आणि तिच्या सुरक्षिततेची काळजी घेतली. त्याने तिला तिचा भाऊ मुहम्मद बिन अबू बकर यांच्या एस्कॉर्टमध्ये मदिना येथे परत पाठवले. हजरत आयशा ही युद्धादरम्यान उंटावर स्वार झाल्यामुळे या युद्धाला जमाल– उंटाची लढाई असे म्हणतात. नंतर, हजरत अली विरुद्ध लढल्याबद्दल हजरत आयशा यांना आयुष्यभर पश्चाताप होत राहीला.

जमालच्या लढाईनंतर, हजरत अली यांनी अमीर मुआविया यांना विनंती केली, त्यांनी अद्याप हजरत अली यांची बैअत घेतली नव्हती, इस्लामच्या सर्वोत्कृष्ट हितासाठी त्यांना सादर करा. परंतु अमीर मुआविया यांनी हे सबब सांगून सादर करण्यास नकार दिला की, हजरत उस्मान यांच्या रक्ताचा, तोसुद्धा उमय्याच्या घराण्यातील होता, त्यांचा प्रथम बदला घेतला पाहिजे. अमीर मुआविया यांनी अमर बिन अस यांच्या मदतीने सैन्य उभारण्यास सुरुवात केली. हजरत अली यांच्याकडे अमीर मुआविया यांच्याशी लढण्यासाठी सीरियाकडे जाण्याशिवाय पर्याय नव्हता. जुलै ६५७ एडीमध्ये दोन्ही सैन्यांची सफेन येथे लढाई झाली. दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाली, परंतु लवाद समितीने या प्रकरणाचा निर्णय घ्यावा, या कराराने लढाई संपली. यामध्ये अबू मुसा अल–अशरी हे हजरत अली यांचे प्रतिनिधीत्व करत होते आणि अमीर मुआविया यांचे प्रतिनिधित्व करणारे अमर बिन अस यांचा समावेश होता. दुर्दैवाने, हा लवाद अयशस्वी झाला कारण अमर बिन अस हा अबू मुसा अल–अशरी यांच्याशी सहमत झालेल्या निर्णयापासून विचलित झाला.

लोकांचा एक मोठा गट, जो मुळात लवादाच्या प्रस्तावाच्या विरोधात होता, त्यांनी हजरत अली यांच्यापासून वेगळे होऊन स्वत:साठी स्वतंत्र अमीर निवडला. या गटाला खवारीजी म्हणतात, खवारीजी म्हणजेच बाहेरचे. सुरुवातीला हजरत अली यांनी त्यांना आपल्या अधीन होण्यासाठी राजी करण्याचा प्रयत्न केला, परंतु ते अयशस्वी झाले. यामुळे एक भयंकर युद्ध झाले ज्यात बहुतेक खवारीजी मारले गेले. या दणदणीत पराभवानंतर खवारीजींनी हजरत अली, हजरत अमीर मुआविया आणि अमर बिन अस यांची हत्या करण्याची योजना आखली. नंतरचे दोघे जीवावर बेतले. फजरच्या नमाजासाठी मशिदीत जात असताना हजरत अली यांना त्यांच्या हल्लेखोराने गंभीर जखमी केले. दोन दिवसांनंतर २१व्या रमजान, ४० हिजरी या धाडसी आणि धार्मिक खलिफाचे निधन झाले. निःसंशयपणे हजरत अली यांनी खिलाफतच्या अखंडतेसाठी आजच्या दिवशी १ एप्रिल रोजी बलिदान दिले. ते त्या दहा आशीर्वादांपैकी एक होते ज्यांना पवित्र प्रेषित यांनी आनंदाची बातमी दिली होती की त्यांना नंदनवन बहाल करण्यात आले आहे.!! शहादते हजरत अली यांना विनम्र अभिवादन !!

## घड्याळ आणि तुतारीचा मेळ साधत अमोल कोल्हेंच्या वधू–वराला शुभेच्छा



**पुणे**–शिरुरमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार अमोल कोल्हे यांनी लग्न समारंभात दिलेल्या शुभेच्छांची सध्या राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. अजित पवारांचे घड्याळ अन् शरद पवारांच्या तुतारीचा मेळ घालत कोल्हेंनी वधू–वरांना राजकीय शुभेच्छा दिल्या आहेत.शिरुरमध्ये अमोल कोल्हे पूर्ण ताकदीने प्रचार करत आहेत. ते वेगवेगळ्या कार्यक्रमांना आवर्जुन हजेरी लावत आहेत.शिरुर लोकसभेसाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून अमोल कोल्हे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. उमेदवारी जाहीर होताच अमोल कोल्हे यांनी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. शनिवारी अमोल कोल्हेंनी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या पुतणीच्या लग्नसोहळ्यास हजेरी लावली. कोल्हे यांना लग्नाला हजेरी लावण्यास थोडा उशीर झाला. त्यानंतर तुम्हाला उशीर का झाला, असं एकाने त्यांना विचारले. तेव्हा प्रश्नाचे उत्तर देताना कोल्हेंनी तुतारी, घड्याळ या निवडणूक चिन्हांचा उल्लेख करत वधू–वरांना आशीर्वाद दिले.या विवाह सोहळ्यातही खासदार कोल्हे यांनी तुतारीचा प्रचार करण्याची संधी मात्र सोडली नाही. विवाह सोहळ्याला उपस्थित राहण्यास उशीर झाल्यामुळे कोल्हे यांनी घड्याळ निघून गेल्यामुळे वेळ जुळेना पण वधूवरांच्या आयुष्यात सुखाची, समाधानाची तुतारी वाजावी अशा मिश्किल शब्दांत शुभेच्छा देत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या या राजकीय टोलेबाजीने दिलीप मोहिते पाटलांनाही हसू आवरता आले नाही.घड्याळ निघून गेल्याने वेळ जुळत नाहीये. पण पण वधू–वराच्या आयुष्यात सुखाची–समाधानाची तुतारी वाजावी, असे म्हणत अमोल कोल्हे यांनी मिश्किल टोला लगावला आहे. तसेच यावेळी अमोल कोल्हे यांनी दिलीप मोहिते यांच्या पत्नीचे चरण स्पर्श केले. अमोल कोल्हेंनी मोहिते पाटलांना कोपरखळी मारली. तुम्ही आशीर्वाद दिला म्हणजे मला मोहिते पाटलांनाही खासदार होण्यासाठी आशीर्वाद दिला, असं समजतो, असे अमोल कोल्हे मोहिते यांच्या पत्नींना म्हणाले.विशेष म्हणजे कोल्हेंच्या या विधानानंतर दिलीप मोहिते पाटलांनाही हसू आवरले नाही. दरम्यान, शिरूर लोकसभा मतदारसंघात अमोल कोल्हे विरुद्ध शिवाजीराव अढळराव पाटील यांच्यात लढत होणार आहे. अढळराव यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतून अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. त्यामुळे या निवडणुकीत कोण बाजी मारणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## संभाजीनगरमधील नाराजीनाट्यावर अखेर पडदा अंबादास दानवे आणि चंद्रकांत खैरेंची भेट



**छत्रपती संभाजीनगर**–छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघासाठी ठाकरे गटातील नेते चंद्रकांत खैरे आणि विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यातील वादावर अखेर पडदा पडायचे चित्र आहे. कारण रविवारी अंबादास दानवे यांनी चंद्रकांत जाहीर यांची थेट त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली नाही. एवढेच नव्हे तर दानवेंनी खैरे यांना निवडणुकीच्या शुभेच्छा देखील दिल्या आहे.

दरम्यान, यावेळी दोन्ही नेत्यांनी हसतखेळत एकमेकांशी संवाद साधला. तसेच एकमेकांना पेढा भरवत आपल्यातील वाद संपल्याचा संदेश दिला आहे. यावेळी खैरे म्हणाले, ''पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आम्हा दोघांशी संवाद साधला. तुम्ही दोघे माझे खंबीर नेते आहात, आपापसात वाद का घालता असे ते म्हणाले. त्यानंतर आम्ही दोघे एकत्र आलो, आम्ही चर्चा केली. त्याच चर्चेचा परिणाम ही भेट आहे'', असे खैरे म्हणाले.तर दानवे म्हणाले, ''संघटना महत्वाची असते हे आमचे विचार आहेत. संभाजीनगर हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. त्यामुळे पक्षाकडून इथे जो उमेदवार असेल त्याच्यासाठी काम करणे हे माझे कर्तव्य आहे. आम्ही सर्व मिळून ताकदीने काम करू. नाराजी ही उमेदवारी जाहीर होईपर्यंत असते. ज्या दिवशी उमेदवारी जाहीर होते त्या दिवशी नाराजी संपलेली असते. आम्ही उद्धव ठाकरेंना दोघांपैकी एकाला उमेदवारी द्या हे सांगितले होते'', असे दानवे म्हणाले.तसेच ''महायुतीचा उमेदवार ठरणे अवघड आहे. उमेदवार मिळत नाही हे त्यांचे दुर्दैव आहे. शिवसेना आम्ही उभी केल्याचे सांगणाऱ्यांना उमेदवार नाही. त्यांना उमेदवार शोधावा लागत आहे. त्यांच्याकडे चार माणसे देखील नाहीत'' असे म्हणत दानवे यांनी शिंदे गटाला टोला लगावला आहे.मागील काही दिवसांपासून छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघात दानवे विरुद्ध खैरे असा वाद पाहायला मिळत होता. दोन्ही नेते लोकसभा निवडणुकीसाठी इच्छुक होते. मात्र, खैरे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. अशात आपण पक्षाचं काम करू, खैरे यांचे काम करणार नसल्याचं दानवे म्हणाले होते. त्यामुळे या दोन्ही नेत्यांमधील वाद कायम असल्याचे बोलले जात होते. एवढेच नाही तर दानवे हे नाराज असून भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या देखील चर्चा सुरू झाल्या होत्या. मात्र, आज अंबादास दानवे यांनी खैरेंची भेट घेत सर्व चर्चांना पूर्णविराम दिला आहे.

## नांदेड विभागात धावली मिरखेल–ते मालटेकडी दरम्यान पहिल्यांदा विद्युत रेल्वे



**हिंगोली**–दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात येणाऱ्या मिरखेल–मालटेकडी या ४५ कि.मी. लोहमार्गावर गुरुवारी (दि.२८) विद्युत रेल्वेची सीआरएस चाचणी दक्षिन मध्य रेल्वेच्या प्रिन्सीपल ऑफ चिफ इलेक्ट्रीकल इंजिनिअर पी.डी. मिश्रा यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. यावेळी मिरखेल येथून दोन विद्युत इंजिन असलेली आठ डब्यांची पहिली विशेष रेल्वे धावली . यामुळे आता या लोहमार्गावरुन विद्युत रेल्वे धावण्यास लवकरच सुरूवात होणार आहे.

दमरेच्या सिकंदराबाद मुख्य विभाग, नांदेड रेल्वे विभागासह एकूण ९२४ कि.मी. लोहमार्गाच्या कामाचे विद्युतीकरण पुर्णत्वास गेले असुन परभणी–मुदखेड लोहमार्गावर गुरुवारी (दि.२८) दमरेच्या मुख्य इलेक्ट्रीकल इंजिनिअर विभागाच्या वतीने प्रलंबित मिरखेल ते मालटेकडी दरम्यानच्या विद्युतीकरणाच्या झालेल्या कामाची तपासणी करून विद्युत रेल्वेची सीआरएस चाचणी घेण्यात आली. दुपारच्या वेळी दोन विद्युत इंजिन असलेली आठ डब्यांची एक विशेष रेल्वे मिरखेल स्थानकावर आली होती. यामध्ये सिकंदराबाद येथिल प्रिन्सीपल ऑफ चिफ इलेक्ट्रीकल इंजिनिअर पी.डी. मिश्रा, सहा. विभागीय व्यवस्थापक आर.के. मीना, सहा. परिचलन व्यवस्थापक विवेकानंद यलप्पा, विनोद साठे आदींची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी विद्युतीकरणातील तांत्रिक बाबीची पाहाणी केली. यानंतर २५ हजार व्होल्ट विद्युत प्रवाह विद्युतीकरण केलेल्या तारांमध्ये सोडण्यात आला. सायंकाळी ४.१५ घ्या सुमारास उद्घाटन करुन ही विशेष रेल्वे पूर्णा मार्गे मालटेकडीकडे धावली. या पहिल्या विद्युत रेल्वेचे चालक प्रदिप कुमार, गार्ड अरुण कुमार यांचा सत्कार करण्यात करुन मिरखेल स्टेशन मास्तर अख्तर पाशा यांनी हिरवा झेंडा दाखवून विद्युत रेल्वेला रवाना केले. सिकंदराबाद येथून आलेल्या पथकाने सोबतच विविध ठिकाणच्या कामाची पाहणी केली. दरम्यान, नांदेड येथून दाखल झालेल्या या अधिकाऱ्यांच्या विशेष पथकाने पूर्णा, चुडावा, लिंबगाव सोबतच मिरखेलपर्यंत सर्व ठिकाणी ही चाचणी केली. तसेच चुडावा येथील सबस्टेशन परिसरात विविध कामांची पाहणी करण्यात आली. याप्रसंगी सबस्टेशन परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. संबंधित पथकाच्या पाहणीनंतर आता पुढे काही दिवसांमध्ये या मार्गावरील नांदेड, पूर्णा, परभणी, परळी, अकोला सोबतच अन्य मार्गावरील विद्युत रेल्वे पुर्ण क्षमतेने धावतील, अशी माहिती सुत्रांनी दिली आहे.

## भिवंडीत भंगाराच्या गोदामाला भीषण आग ; १५– २० गोदाम जळून खाक



**भिवंडी**–भिवंडीत आगीचे सत्र सुरूच आहे. भिवंडी तालुक्यातील ओवळी ग्रामपंचायत हद्दीत भंगाराच्या गोदामाला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या आगीत १५ ते २० गोदाम जळून खाक झालेत. तर जवळच उभ्या असलेल्या चार चाकी गाड्याही जळाल्या आहेत. दरम्यान, आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र पाण्याची कमतरता असल्याने या आगीवर अद्यापही नियंत्रण मिळालेले नाही.

रात्री ११ च्या सुमारास ही आग लागल्याची माहिती आहे. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. आग विझवण्यासाठी पाण्याची कमतरता आहे. या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणखी दोन ते तीन तास लागण्याची शक्यता आहे. या आगीचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. तसेच सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.दरम्यान आगीत भंगार गोदाम, लाकडी प्लाय, प्लास्टिकच्या वस्तू, कागदांची रद्दी यांचा समावेश होता. आग इतकी भीषण आहे की, परिसरात धुराचे लोट दिसून येत होते. दरम्यान, या आगीने जवळ उभ्या असलेल्या वाहनांना विळखा घातला. यामुळे नागरिक चांगलेच धास्तावले होते.दरम्यान काही दिवसांपूर्वीच भिवंडी तालुक्यातील अंजुरफाटा ते दापोडा रस्त्यालगत असलेल्या एका भंगाराच्या गोदामाला भीषण आग लागली होती. या आगीत भंगारच्या चार गोदाम आणि चार दुकान असे एकूण आठ गोदामासह दुकान जळून खाक झाल्याची होती.आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी दाखल झाले होते. तेव्हा तब्बल ३ तासांच्या अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आली होती.

## महादेव जानकर परभणीचे महायुतीचे उमेदवार:राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या कोटयातून रासपला जागा,ठाकरेंच्या संजय जाधवांना देणार आव्हान

**मुंबई (वृत्तसंस्था)**

महायुतीकडून परभणी लोकसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार म्हणून राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांच्या नावाची घोषणा झाली आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी ही घोषणा केली. दरम्यान, परभणीत महाविकास आघाडीच्या वतीने ठाकरे गटाचे विद्यमान खासदार संजय जाधव यांना उमेदवारी जाहीर झालेली असल्याने या ठिकाणी जाधव विरुद्ध जानकर अशी थेट लढत पाहायला मिळणार आहे.

सुनील तटकरे हे मुंबईत पत्रकारांशी बोलत होते. ते म्हणाले की, भारतीय जनता पार्टी, शिवसेना, व राष्ट्रवादीच्या वतीने एकत्र येत परभणी लोकसभा मतदारसंघाची जागा ही राष्ट्रवादीच्या वाट्याला आली. दरम्यान, राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व आम्ही पक्षातील सर्वांनी एकत्र येत निर्णय घेतला व परभणीची जागा ही राष्ट्रवादीच्या कोट्यातून 'रासप'ला देण्यात आली. या ठिकाणी अधिकृत उमेदवार म्हणून महादेव जानकर हे असतील, अशी माहिती सुनील तटकरे यांनी दिली.सुनील तटकरे म्हणाले की, महायुतीचे जागावाटप व त्यासंदर्भातील काही घोषणा देखील झाल्या आहेत. भाजपने २४ जागावर उमेदवार घोषणा केली. शिवसेनेच्या वतीने देखील अधिकृत ८ उमेदवारांची घोषणा करण्यात आली. तसेच राष्ट्रवादीच्या वतीने देखील सात ते आठ जागा मागितलेल्या आहेत. परंतु आज प्रामुख्याने आम्ही मागितलेल्या जागांमध्ये परभणी लोकसभा मतदारसंघ होता. त्याठिकाणी आम्ही रासपला ही जागा देण्याचा निर्णय घेतला.रायगड लोकसभा मतदारसंघात देखील वाद होते, त्यामुळे काही भाजप पदाधिकारी



यांनी बावनकुळे यांची भेट घेतली नाराजी व्यक्त केली. पण त्या ठिकाणी मी देखील उपस्थित होतो. सर्वांशी संवाद साधला व आता भाजप पदाधिकारी हे माझे अर्थात महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून कामाला लागतील, नाशिकच्या बाबतीत देखील दोन्ही पक्षाकडून मागणी आहे. पण त्यावर देखील चर्चा होणार आहे. त्यामुळे चर्चा कशा व कोणीही करत असले तरी त्याला अधिकृत काही मान्यता नसते, असे सुनील तटकरे म्हणाले.बारामतीत स्पष्ट असताना देखील उमेदवार का जाहीर का केला जात नाही, असा प्रश्न विचारल्यानंतर सुनील तटकरे म्हणाले की, घड्याळाचे काटे फिरत राहणार आहे. उमेदवारही घोषित केला जाईल. त्यामुळे योग्य वेळी घोषणा केली जाईल, याची चिंता करू नका.जानकर म्हणाले की, मी सुरूवातीपासूनच महायुतीमध्ये होतो. मधल्या काळात थोडे वाद विवाद होत असतात. पण मी कधीही महायुतीपासून वेगळा झालेला नव्हतो. त्यामुळे पत्रकारांनी देखील मनात शंका ठेऊ नये, असे महादेव जानकर म्हणाले.

सह्याद्रीचा राखणदार



# महाविकास आघाडीत एकोपा नाही–ॲड.प्रकाश आंबेडकर

**नागपूर । वृत्तसंस्था**

राज्यात लोकसभेच्या मैदानामध्ये महायुती व 'मविआ'मध्ये तुल्यबळ लढतीचे संकेत आहेत. त्यामुळे मतविभाजन टाळण्यासाठी 'मविआ'कडून वंचितला सोबत घेण्याचे प्रयत्न सुरू होते. परंतु, ड. प्रकाश आंबेडकर यांनी आघाडीचा प्रस्ताव फेटाळत आपल्या उमेदवारांची घोषणा केली. यासंदर्भात सांगताना ड. आंबेडकर म्हणाले की, महाविकास आघाडीमधील तिन्ही पक्षात आताही एकोपा नाही. प्रत्येक पक्ष स्वतंत्र उमेदवार यादी जाहीर करत आहेत.

त्यांच्यामधील काही जागांवरील तिढा अद्यापही कायम आहे. त्यामुळे अशांसोबत आम्ही पुन्हा जाऊन बिघाड घालणे योग्य नाही. परंतु, आम्ही काँग्रेस अध्यक्षांना पत्र लिहून महाराष्ट्रातील सात जागांवर पाठिंबा देण्याचे जाहीर केले. काँग्रेसने सातपैकी दोन जागांची नावे सांगितली त्यानुसार नागपूर आणि कोल्हापूरला आम्ही वंचितचा उमेदवार न देता पाठिंबा दिला.अन्य पाच जागांवर माहिती काँग्रेसकडून आल्यावर त्याही सांगण्यात येतील असेही आंबेडकर म्हणाले. वंचित या निवडणुकीमध्ये महाराष्ट्रातील बहुतांश मतदारसंघ लढवणार असल्याचेही त्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि आरएसएसला निवडणुकीत अंगावर घ्यावे लागेल. त्यांच्या दहा वर्षांच्या कामाच्या उणिवा जनतेला सांगाव्या लागतील. मात्र, ही ताकद 'मविआ'च्या नेत्यांमध्ये नसून ती वंचितमध्ये आहे असेही आंबेडकर म्हणाले. रविवारी नागपुरात झालेल्या पत्रकार परिषदेत पक्षाचे प्रमुख ड. प्रकाश आंबेडकर यांनी ही माहिती दिलीआम्ही निवडणूक लढतो. जनता ठरवेल की कुठल्या पक्षाला किती जागा द्यायच्या. मात्र, जे लोक जुगार खेळतात ते आकड्यांची भाषा करतात. त्यामुळे ४०० पार हा जुगारांचा आकडा आहे असेही प्रकाश आंबेडकर म्हणाले.प्रस्थापितांविरोधात विस्थापित अशी ही निवडणूक होणार आहे. प्रस्थापित पक्ष आणि नेत्यांना वंचित उमेदवारांना समोर येऊ द्यायचे नसल्यानेही 'मविआ'सोबत जाता आले नाही असा आरोपही आंबेडकर यांनी केला. आघाडीची बोलणी सुरू असताना २७ जागांवरील उमेदवारांची यादी दिली होती. या जागांचा आम्ही अभ्यास केला होता. आता त्याला कुणी गांभीर्याने घेतले नाही असेही आंबेडकर म्हणाले.निवडणूक रोख्यांचा भ्रष्टाचार, हुकूमशहा मोदी आणि ओबीसी समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा हे विषय घेऊन आम्ही निवडणुकीमध्ये उतरणार आहोत. निवडणूक जशी जवळ येईल तशी भाजप आणि वंचित यांच्या उमेदवारातच लढत असल्याचे दिसून येईल असेही आंबेडकर म्हणाले. निवडणुकीवर राम मंदिराचा मुद्दा प्रभावी ठरणार नसून महागाई, बरोजगारी हे प्रमुख मुद्दे असल्याचेही आंबेडकर म्हणाले.



# अमर काळे २ एप्रिललाच उमेदवारी अर्ज दाखल करणार ; त्यांनी हाच दिवस का निवडला?

**वर्धा । वृत्तसंस्था**

अखेर महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार म्हणून घोषित झालेले माजी आमदार अमर काळे आता निवडणुकीच्या तयारीस लागले आहेत. उमेदवारीचे नामांकन पत्रे सादर करण्यासाठी त्यांनी दोन एप्रिल ही तारीख निवडली आहे. कारण काय तर हा त्यांची आई अनुराधाताई शरद काळे यांचा स्मृतिदिन आहे.

वडिलांच्या निधनानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत अमर काळे हे विधानसभेसाठी उभे झाले होते. तेव्हा प्रचाराची पूर्ण कमान अनुराधाताई यांनीच सांभाळली होती, असे त्यांचे स्नेही सांगतात. पुढे आईच निवडणुकीची जबाबदारी स्वीकारत. कुठे प्रचारात अडले तर त्याच काम मार्गी लावत होत्या, असे सांगितल्या जाते. आपल्यावर आईचा आशीर्वाद नेहमीच राहला. त्यांचा स्मृतिदिन मला जुन्या आठवणींना जागे करून जातो. त्यामुळे एका नव्या रिंगणात म्हणजेच लोकसभा निवडणुकीत मी प्रथमच उतरतोय, म्हणून आईच्या स्मृतीस नमन करीत या कार्यास सुरुवात करणार, असे अमर काळे म्हणतात.त्यांना राष्ट्रवादीने उमेदवारी दिली आहे. मात्र त्यांच्या प्रचाराची दारोमदार इंडिया आघाडीने स्वीकारली आहे. आर्वीचे असलेले अमर काळे प्रथमच लोकसभा निवडणुकीमुळे वर्धेत आसन मांडणार. त्या अनुषंगाने त्यांनी प्रचार कार्यालय पाहणे सुरू केले. स्वाध्याय मंदिरात ते व्यवस्था पाहून आले. लगतच वर्षा तिगावकर यांचे पाहुणचार हे झुणका भाकर केंद्र असल्याने कार्यकर्त्यांची सोय लावणे सोयीचे ठरू शकते, असा विचार झाला. आणखी पण जागा लवकर ठरविणे आवश्यक आहे. कारण अर्ज भरण्यासाठी रॅली काढायची कुठून हा प्रश्न असल्याचे शेखर शेंडे यांनी सांगितले. दोन एप्रिल रोजी आईच्या स्मृतीस अभिवादन करीत कूच करणार असल्याचे ठरले आहे.




# मोठ्या भावाची बायको आई समान:त्यांना विरोधात लढवण्याची वेळ येणे हे भाजपचे दुर्दैव– सुप्रिया सुळे

**बारामती**–मोठ्या भावाची बायको ही आई समान असते. त्यांना विरोधात लढवणे हे भाजपचे दुर्दैवी राजकारण आहे अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्या उमेदवारीवर दिली आहे. तसेच महागाई, बेरोजगारी, दडपशाही विरोधात माझी लढाई असणार आहे असे त्यांनी स्पष्ट केले आहे. आज सुप्रिया सुळे बारामती लोकसभा मतदारसंघाच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला.

यावेळी त्या म्हणाल्या, ''आमचं घर फोडून भाजपवर उमेदवार देण्याची वेळ आली आहे. मोठ्या भावाची बायको ही आई समान असते आणि आमच्या आईला निवडणुकीत उतरून भाजपला निवडणूक लढावी लागते. हे किती दुर्दैवी आहे. हेच भाजपचे राजकारण आहे'', असे म्हणत त्यांनी सुनेत्रा पवार यांच्या बारामती मतदारसंघातील उमेदवारीवर भाष्य केले आहे.तसेच यावेळी त्यांनी बारामतीकरांना आवाहन देखील केले आहे. ''मी इंडिया आघाडीचे आभार मानते. पुन्हा एकदा लोकसभा निवडणूक लढण्याची मला संधी दिली. बारामती लोकसभा मतदारसंघाचे आभार मानते पुन्हा लोकप्रतिनिधी म्हणून निवडून द्यावं, अशी विनंती करते. तसेच माझं मेरिट पाहून मतदान करा'', अशी साद त्यांनी बारामतीकरांना घातली आहे.याशिवाय ''माझा कोणालाही व्यक्तिगत विरोध नाही. मी वयक्तिक टीका केलेली नाही. महागाई, बेरोजगारी, दडपशाही विरोधात माझी लढाई असणार आहे. माझ्यावर कोणत्याही भ्रष्टाचाराचा आरोप झालेला नाही. माझे लोकसभेतील काम देशाने पाहिले आहे. मी लीडसाठी निवडणूक लढत नाही. मी सेवेसाठी निवडणूक लढते'', असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.तसेच यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर देखील जोरदार टीका केली आहे. ''मोदी सरकार लोकशाहीमध्ये दडपशाही करत आहेत. लोकशाही अडचणीत अली तर कितीही किंमत मोजावी लागली तरी त्याच्या विरोधात आम्ही लढू. गुन्हेगारी राज्यात वाढली आहे. सत्तेत असलेले आमदार पोलिस ठाण्यात जाऊन गोळीबार करतात. जेव्हा जेव्हा देवेंद्रजी गृहमंत्री होतात. तेव्हा राज्यात गुन्हेगारी वाढते हे डेटा सांगतो'', असं म्हणत सुप्रिया सुळे यांनी देवेंद्र फडणवीसांवर निशाणा साधला आहे.



# 'नवनीत राणांच्या जात प्रमाणपत्राचा निकाल भाजपला ठाऊक आहे का?'–सुषमा अंधारे

**अमरावती । वृत्तसंस्था**

खासदार नवनीत राणा यांच्या बनावट जात प्रमाणपत्र प्रकरणाचा निकाल सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असताना भाजपसारखी महाशक्ती नवनीत राणांना उमेदवारी कशी काय देऊ शकते, भाजपला न्यायालयाचा निकाल आधीच ठाऊक झाला आहे का, असा सवाल करीत शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी नवनीत राणा यांच्यावर जोरदार टीका केली.

महाविकास आघाडीच्या वतीने काँग्रेसचे उमेदवार बळवंत वानखडे यांनी शनिवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी नेहरू मैदानावर आयोजित जाहीर सभेत त्या बोलत होत्या. यावेळी माजी मंत्री यशोमती ठाकूर, डॉ. सुनील देशमुख, अनिल देशमुख, रमेश बंग, माजी खासदार अनंत गुढे, आमदार धीरज लिंगाडे, उमेदवार बळवंत वानखडे, माजी आमदार वीरेंद्र जगताप, ज्ञानेश्वर धाने, शिवसेनेचे सुधीर सुर्यवंशी, सुनील खराटे, बबलू देशमुख आदी उपस्थित होते.सुषमा अंधारे म्हणाल्या, अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या जागेवर बनावट प्रमाणपत्राच्या आधारे निवडणूक लढवून नवनीत राणा यांनी मतदारांची फसवणूक केली आहे. अनुसूचित जातीच्या अधिकारांवर गदा आणली आहे. काँग्रेसच्या उमेदवार रश्मी बर्वे यांचे जात प्रमाणपत्र एकाच दिवसात रद्द केले जाते, पण नवनीत राणांच्या प्रकरणात पाच वर्षे हातही लावला जात नाही, ही शोकांतिका आहे.मध्यंतरीच्या काळात आपण अमरावती लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढविणार असल्याची चर्चा सुरू होती. जर आपल्याकडे बनावट जात प्रमाणपत्र तयार करण्याची ताकद असती आणि मोदींची गॅरंटी असती, तर आपल्याला ही जागा लढवता आली असती, असा टोला सुषमा अंधारे यांनी लगावला.आरत्या, श्लोक म्हणणे ही काही खासदाराची पात्रता असू शकत नाही. त्यासाठी गुरूजी नेमता येऊ शकतात. एकीकडे, महाविकास आघाडी ही अतिशय सन्मानाने कोल्हापूरचे श्रीमंत शाहू महाराज यांना उमेदवारी बहाल करते, तर छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज उदयनराजे भोसले यांना महायुतीकडून प्रतीक्षायादीत ठेवले जाते. ही भाजपची वागणूक आहे. नवनीत राणा यांना आधी उमेदवारी जाहीर केली जाते आणि नंतर मध्यरात्री पक्षात प्रवेश दिला जातो. त्यांना नरेंद्र मोदी, अमित शाह यांच्या भेटीसाठी लगेच वेळ दिला जातो. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अनेकवेळा भेटीसाठी ताटकळत असतात. नवनीत राणा यांचे राजकीय वजन वाढले की ही देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी धोक्याची घंटा आहे, अशा शब्दात त्यांनी भाजपवर टीका केली. फडणवीस यांनी पक्ष फोडले, पण त्यांना मुख्यमंत्री होता आले नाही. ते अस्वस्थ आहेत. खरे तर महायुतीत आलबेल नाही. खदखद सुरू आहे. प्रसार माध्यमे मात्र महाविकास आघाडीत धुसफूस सुरू असल्याचे सांगतात, ते चुकीचे आहे. महाविकास आघाडीत एकजूट आहे, असा दावा सुषमा अंधारे यांनी केला.



# सावधान! अवैध बायो डिझेलची सर्रास विक्री; ३१ हजार लिटर साठा जप्त



**बुलढाणा :** राष्ट्रीय व राज्य मार्गालगत राजरोसपणे अवैध बायो डिझेलची सर्रास विक्री होत आहे. पोलीस विभागाने केलेल्या मोठया कारवाईत तब्बल ३१ हजार लिटर इंधन साठा जप्त करण्यात आला आहे. यावेळी ३४ लाखांचा मुद्धेमाल ताब्यात घेण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक सुनील कडासने, स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक अशोक लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध पथकांनी ही कारवाई केली. चिखली 'एमआयडीसी', मलकापूर व दसारखेड एमआयडीसी येथे एकाचवेळी ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत ३१ हजार ४०५ लिटर अवैध बायोडिझेल सह एकूण ३४ लाख २० हजारचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चिखली येथील किसान बायोडिझेल, काठोडे ट्रेडर्स, मलकापूर येथील हॉटेल निसर्ग व हॉटेल सहयोग जवळ, पद्मने महाराज शेताजवळ, हॉटेल अमन जवळ छापे घालण्यात आले.या प्रकरणी आरोपी सचिन लोखंडे, ज्ञानेश्वर काठोडे राहणार चिखली, नफिस खान वडणेर भोलजी नांदुरा, हेमंत काचकुरे तालासवाडा मलकापूर, परमेश्वर वनारे माकनेर ता मलकापूर, शेख जावेद, मोहमद जिया मो युसूफ, गुरफान खान गफार खान राहणार मलकापूर याना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या विरुद्ध भादवी कलम २८५, जीवनावश्यक वस्तू कायदा कलम ३ व ७ नुसार कारवाई करण्यात आली आहे.

# विदर्भ,मध्य महाराष्ट्र,मराठवाड्यात वादळी पावसाचा इशारा कायम



**पुणे**–सुर्य आग ओकत असल्याने राज्यात उन्हाची ताप चांगलीच वाढली आहे. दिवसा उन्हाच्या झळा असह्य ठरत असून रात्री देखील उष्ण ठरत आहेत. अकोलामध्ये उच्चांकी ४२.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. तर आज विदर्भ, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. राज्यासह देशाच्या हवामानात पुन्हा एकदा बदल पाहायला मिळत आहे. काही ठिकाणी तापमानात वाढ होत आहे तर काही ठिकाणी पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे.

राज्यात काही ठिकाणी आज पावसाची शक्यता वर्तवण्यात येत आहे. पुढील २४ तासात राज्यात मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर इतर ठिकाणी तापमानाचा पारा वाढण्याची शक्यता आहे. विदर्भातील अमरावती, भंडारा, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा आहे.याशिवाय शनिवारी अनेक ठिकाणी अवकाळी पावसाच्या सरी कोसळल्या. यामुळे नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला. मात्र शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे. भंडारा, हिंगोली, नाशिक, नागपूर, मालेगाव, अमरावती, वाशीम या जिल्ह्यांमध्ये अवकाळी पाऊस झाला. हा पाऊस रब्बी हंगामातील भात पिकांना फायद्याचा झाला आहे. मात्र पावसाने शेतातील हळद, ज्वारी यासह भाजीपाला वर्णीय पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहेनव्याने सक्रीय होणाऱ्या वेस्टर्न डिर्स्टबन्समुळे हवामानावर परिणाम होण्याची शक्यता आहे. दरम्यान, उर्वरित राज्यात तापमानात वाढ होण्याचा अंदाज आहे. पुणे, ठाणे आणि मुंबईत उन्हाच्या झळा बसत आहेत. पुढील दोन ते तीन दिवसात तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

# गांधी विचारासाठी फडणवीसांनी मुन्नाभाई एमबीबीएस चित्रपट पाहावा:मी थिएटर बुक करेन–नाना पटोले

**मुंबई**–राहुल गांधी जर सावरकर चित्रपट पाहायला येणार असतील तर मी अख्खं थिएटर बुक करेन, असा खोचक टोला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लगावला होता. त्यावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पलटवार केला आहे. गांधी विचार समजून घेण्यासाठी फडणवीसांनी मुन्नाभाई एमबीबीएस हा चित्रपट पाहावा, त्यासाठी मी थिएटर बुक करेन, असा टोला त्यांनी लगावला.

नाना पटोले म्हणाले की, मोदींवरचा सिनेमा फ्लॉप झाला. नितीन गडकरींवरील हायवे मॅन सिनेमा फ्लॉप झाला. गोडसेवरील चित्रपट फ्लॉप झाला आणि सावरकर चित्रपटही फ्लॉप झाला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुन्नाभाई चइइड चित्रपट पाहावा, गांधी विचारासाठी फडणवीसांनी हा चित्रपट पाहायला हवा त्यांच्यासाठी थिएटर बुक करतो, असा टोला नाना पटोले यांनी लगावला.नाना पटोले म्हणाले की, भारतीय जनता पक्षाचे तानाशाही सरकारला सत्तेतून पायउतार करण्यासाठी तसेच लोकशाही व्यवस्था व संविधान टिकवण्यासाठी हा लढा सुरु आहे. ईडी, सीबीआय, इन्कम टॅक्सची भिती दाखवून भाजपा दुसऱ्या पक्षातील लोकांना पक्षात प्रवेश देते पण त्याचाही काही फरक पडत नाही.नाना पटोले म्हणाले की, महाविकास आघाडीसाठी चांगले वातावरण असून पहिल्या टप्यातील विदर्भातील पाचही जागांवर काँग्रेस, महाविकास आघाडीचे उमेदवार मोठ्या मताधिक्क्याने विजयी होतील. मोदी सरकारची जुमलेबाजी व फेकुगिरी आता चालणार नाही, लोकसभा निवडणुकीत जनता भारतीय जनता पक्षाच्या तानाशाही सरकारला सत्तेतून हद्दपार केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही असं त्यांनी सांगितले.त्याचसोबत राहुल गांधी यांच्याशी तुलना करु नका, राहुल गांधी यांनी पदयात्रा काढून देशाच्या जनतेच्या मनात आपले स्थान निर्माण केले आहे. राज्यातील कायदा व सुव्यवस्था अत्यंत खालावलेली आहे, टिंगळटवाळी करण्यापेक्षा कायदा सुव्यवस्थेकडे लक्ष द्या व जनतेच्या मुलभूत प्रश्नांवरही लक्ष द्या असा खोचक सल्लाही नाना पटोले यांनी देवेंद्र फडणवीसांना दिला.सोलापूरचे माजी आमदार दिलीप माने व वंचित बहुजन आघाडीचे लातूर जिल्हाध्यक्ष जगदिश माळी यांनी समर्थकांसह काँग्रेस पक्षात प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या उपस्थितीत हा पक्ष प्रवेश कार्यक्रम पार पडला. नाना पटोले यांनी दोघांचेही काँग्रेस पक्षात स्वागत केले.यावेळी सुशीलकुमार शिंदे म्हणाले की, दिलीप माने हे काँग्रेस पक्षाचेच होते पण मध्यंतरी इतर पक्षात गेले परंतु योग्यवेळ पाहून ते आज पुन्हा स्वगृही परतले आहेत. कार्यकर्त्यांशी चांगले संबंध असलेला नेता अशी त्यांची ओळख असून त्यांच्या काँग्रेस प्रवेशाने सोलापूर जिल्ह्यात पक्षाला आणखी बळ मिळाले आहे. भाजपाकडून प्रणिती शिंदेंनाही ऑफर होती पण आम्ही काँग्रेस सोडून कुठेही जाणार नाही असंही त्यांनी स्पष्ट केले.

# सुप्रिया सुळे 3 लाखाहून अधिक मताधिक्याने निवडून येतील–पवार

पुणे–पवार विरुद्ध पवार असा संघर्ष घडवून आणण्याचे भाजपचे मनसुबे त्यांच्यासोबत गेलेले आपले लोक कदाचित यशस्वी होऊ देणार नाहीत. दुर्दैवाने आज भाजपची चाल यशस्वी ठरली असा टोला शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी अजित पवार गटाला लगावला आहे.

दरम्यान सुप्रिया सुळे यांनी याआधीत इथे विद्यमान खासदार म्हणून शड्डू ठोकला आहे.तर त्यांच्याविरोधात त्यांच्या वहिनी सुनेत्रा पवार उभ्या राहणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. या निवडणुकीत सर्व कुटुंब हे सुप्रिया सुळेच्या पाठिशी असून अजित पवारांच्या विरोधात असल्याचे दिसून येत आहे.यात शरद पवार गट आणि अजित पवार गट यांच्यात वाकयुद्ध सुरू झाले आहे. दोन्ही गटातील नेते एकमेकांवर टीका करण्याची एकही संधी सोडताना दिसून येत नाहीये. यातूनच आज रोहित पवारांनी अजित पवारांसह भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे.दुसरीकडे सुनेत्रा पवार यांनी उमेदवार निश्चित केल्यानंतर आता त्यांच्या प्रचाराला सुरुवात झाली आहे.

# मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी 'बुथ लेव्हल मॅनेजमेंट'–जिल्हाधिकारी विनय गौडा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर लोकसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४ करीता जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज असून आगामी निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी 'बुथ लेव्हल मॅनेजमेंट' चे नियोजन करण्यात आले आहे, असे प्रतिपादन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले.नियोजन सभागृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी उपस्थित होते.

२०१९ च्या चंद्रपूर लोकसभा निवडणुकीमध्ये एकूण ६४.८४ टक्के मतदान झाले होते, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, चंद्रपूर शहरात मतदानाची टक्केवारी कमी होती. शहरातील काही मतदान केंद्रावर तर ५० टक्क्यांपेक्षाही कमी मतदान झाले. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यावर प्रशासनाचा भर आहे. ज्या मतदान केंद्रावर ५० टक्क्यांपेक्षा कमी मतदान झाले, अशा भागात विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. तसेच 'बुथ लेव्हल मॅनेजमेंट' अंतर्गत मतदारांना



केंद्रावर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. यात उन्हाचा तडाखा बसू नये म्हणून मंडप उभारणे, जेणेकरून मतदारांना सावली मिळेल, पिण्याचे पाणी, प्रत्येक मतदान केंद्रावर दिव्यांग मतदारांसाठी व्हीलचेअरची व्यवस्था करण्यात येणार आहे.तसेच ८५ वर्षांवरील मतदार, गर्भवती माता, स्तनदा माता यांना मतदानासाठी प्राधान्य देण्यात येईल. या मतदारांना रांगेत उभे राहण्याची आवश्यकता नाही. यासोबतच चंद्रपूर लोकसभा मतदार संघातील सहाही विधानसभा मतदारसंघात दिव्यांग व्यवस्थापित मतदान केंद्र, महिला व्यवस्थापित मतदान केंद्र, युवा मतदान केंद्र, आणि आदर्श मतदान केंद्राचे नियोजन करण्यात येणार आहे. निवडणूक संदर्भात काही संशयास्पद बातमी किंवा व्हीडीओ क्लिप आढळली तर त्याची खात्री करावी व प्रशासनाशी संपर्क करावा. चुकीची बातमी आपल्याकडून जाणार नाही, याबाबत सर्वांनी दक्षता घ्यावी. निवडणुकीसंदर्भात सर्व परवानग्या मिळण्यासाठी जिल्हास्तरावर तसेच विधानसभा मतदारसंघ स्तरावर 'एक खिडकी' कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच ऑनलाईन परवानगी सुध्दा घेता येणार आहे, असेही जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी सांगितले.

### चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाचा निवडणूक विषयक तपशील :

२७ मार्च २०२४ अखेर चंद्रपूर लोकसभा मतदार संघात एकूण १८ लक्ष ३७ हजार ९०७ मतदार असून यापैकी ९ लक्ष ४५ हजार ७३६ पुरुष मतदार, ८ लक्ष ९२ हजार १२२ स्त्री आणि ४८ इतर मतदार आहेत. मतदान केंद्रांची एकूण संख्या २११८ आहे. चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात १८ ते १९ वयोगटातील युवा मतदारांची संख्या २४४४३ आहे. तसेच ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेले मतदार १६४४२ असून दिव्यांग मतदारांची संख्या ९६९४ आहे.१९ मार्च २०२४ रोजी झालेल्या प्रथमस्तरीय तपासणी अंती २११८ मतदान केंद्रावर २६१० बॅलेट युनीट, २६१० कंट्राल युनीट आणि २८१८ व्हीव्हीपॅटचे वाटप करण्यात आले आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते पूर्वपीठिका–२०२४ चे विमोचन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक १९ एप्रिल २०२४ रोजी होत आहे. या पार्श्वभुमीवर गत निवडणुकांमध्ये विविध राजकीय पक्ष किंवा उमेदवारांना मिळालेली मते व इतर बाबी अभ्यासण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने पूर्वपीठिका – २०२४ ची निर्मिती करण्यात आली आहे. या पूर्वपीठिकेचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. नियोजन सभागृह येथे पार पडलेल्या कार्यक्रमाला मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी, जिल्हा माहिती अधिकारी राजेश येसनकर उपस्थित होते.पूर्वपीठिका – २०२४ मध्ये सन १९५१ ते २०१९ या कालावधीतील



विधानसभा मतदारसंघनिहाय माहिती, निवडणूक यंत्रणेशी संबंधित महत्वाचे दूरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमांक, आदर्श आचारसंहितेतील ठळक बाबी, निवडणूक प्रक्रियेदरम्यान 'काय करावे' किंवा 'काय करू नये' याबाबत माहिती, जिल्ह्यातील तसेच चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातील एकूण मतदारसंख्या, मतदान केंद्र, निवडणुकीचा कार्यक्रम आदी माहिती समाविष्ट करण्यात आली आहे.

# लोक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घेतला 'आनंद मेळ्याचा' मनसोक्त आनंद

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

दि रूरल एज्यूकेशन सोसायटी,ब्रम्हपुरी द्वारा संचालित नागभीड तालुक्यातील सावरगाव येथील लोक विद्यालय शाळेत गुरुवारी दि.२८ मार्च रोजी बाल आनंद मेळावा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या मेळाव्याचे उदघाटन लोक विद्यालयाचे मुख्याध्यापक पुरुषोत्तम कामडी यांच्या हस्ते पार पडले.यावेळी जेष्ठ शिक्षक नरेंद्र घोडमारे,सहायक शिक्षक राजू आमले, पदमाकर निखारे, उद्धव देशमुख ,शैलेश खंडाळे, उत्तम बोरकर,सहायक शिक्षिका संगीता ढोके, शिक्षक बदखल, श्रीकांत बोरकर,गीता,सुधीर शिवणकर, कर्मचारी मोहन डोंगरे, शारदा रामटेके आदींची उपस्थिती होती.या आनंद मेळ्यात विद्या र्थ्यांच्या वर्गाचे गट पाडण्यात आले



होते.यामध्ये वर्ग ५ वी साठी संगीत खुर्ची,वर्ग ६ वी साठी मेहंदी काढणे,वर्ग ७ वी साठी चित्रकला,वर्ग ८ वी साठी समूह गायन तर वर्ग ९ साठी विविध खाण्याच्या पदार्थांच्या विक्रीचे स्टॉल.अशा प्रकारे नियोजन करण्यात आले.या उपक्रमात प्रत्येक वर्गाच्या सर्व विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. व विद्यार्थ्यांनी लावलेल्या स्टॉल मधील गुपचूप, ढोकळा, गुलाब जामुन,साबुदाना वडा,पास्ता, चहा,इडली–सांभर आदीं पदार्थांची विद्यार्थी व शिक्षकांनी खरेदी केली व मनसोक्त आस्वाद घेतला. त्यामुळे बहुतेक स्टॉल वरील ९९ टक्के पदार्थांची विक्री झाली व विद्यार्थ्यांना खरी कमाई काय असते याचा प्रत्यक्ष अनुभव या बाल आनंद मेळ्यातून घेता आला.

# गडचिरोली चिमूर लोकसभा मतदार संघात विकासाच्या प्रश्नांवर मतदारांचा कल



**शेषराव राऊत**
**चिमूर तालुका निवडणूक वार्तापत्र**

गडचिरोली चिमूर लोकसभा मतदारसंघात विकासाचे अनेक प्रश्न प्रलंबित असून त्यात महागाई, बेरोजगारी, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, रेल्वेचा प्रश्न, रोडचे प्रश्न, सिंचनाचा प्रश्न, शेतकऱ्यांच्या मालाच्या हमीभावाचा प्रश्न, शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचा प्रश्न, पिक विम्याचा प्रश्न, पांदन रस्त्यांचा प्रश्न तसेच महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न असे विविध प्रश्न प्रलंबित असून आज पर्यंत हे प्रश्न गडचिरोली चिमूर लोकसभा क्षेत्रात उभे आहेत. आज पर्यंत हे प्रश्न सोडवण्याचा कोणत्याही पक्षाच्या खासदाराने या क्षेत्रात प्रयत्न केला नाही. त्यामुळे या क्षेत्रातील मतदारांचा हे प्रश्न सोडवणाऱ्या उमेदवाराकडे विशेष कल आहे. मतदारांना निवड आश्वासन देणारा उमेदवार नको आहे, तर क्षेत्रामध्ये काम करणारा उमेदवार हवा, त्यामुळे क्षेत्रातील मतदार सध्यातरी विकासाची प्रश्न सोडवणाऱ्या उमेदवाराच्या शोधात असल्याचे चित्र दिसत आहे.

या क्षेत्रात दहा उमेदवार आपले भाग्य आजमावत असले तरीही खरी लढत ही भारतीय राष्ट्रीय काँग्रेस चे उमेदवार डॉक्टर नामदेव दयाराम किरसाण व भाजपाचे अशोक महादेव नेते यांच्यामध्ये होत असल्याचे चित्र दिसत आहे. २०१४ व २०१९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे उमेदवार नामदेवराव उसेंडी यांचा पराभव होऊन भाजपाचे अशोक नेते हे दोनदा या क्षेत्रातून निवडून आले होते. परंतु यावेळी काँग्रेस पक्षाने नामदेवराव उसेंडी यांना तिकीट न देता नवीन उमेदवार डॉक्टर नामदेव किरसाण यांना उमेदवारी दिली. त्यामुळे नाराज होऊन नामदेव उसेंडी यांनी भाजपात प्रवेश घेतला. परंतु नामदेव किरसाण हे गडचिरोली चिमूर मतदार संघात दोन वर्षापासून भेटीगाठी घेत असून लोकांच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न करीत असल्याने काँग्रेस पक्षाच्या उमेदवारीचे ते प्रबळ दावेदार ठरले. तसेच भाजपाचे अशोक नेते हे या क्षेत्राचे दोनदा खासदार राहिले असून या दहा वर्षांमध्ये त्यांचा फक्त निवडणुकीपुरता मतदारांशी संपर्क असल्याची व ते मोदी लाटेमुळे दोनदा निवडून आले असल्याची नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे. तसेच या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात आदिवासी मतदारांची संख्या असूनही आदिवासी समाजाकरिता या दहा वर्षांमध्ये काहीही केले नसल्याची भावना आदिवासी मतदारांमध्ये आहे. त्यामुळे परिवर्तनाच्या लाटेमध्ये ही निवडणूक त्यांना जड जाण्याचे संकेत मिळत आहे. तरीपण या लोकसभा क्षेत्रामध्ये भारतीय जनता पक्षाच्या युवा कार्यकर्त्यांची वाढलेली शक्ती आणि पद्धतशीर गावागावात वाढलेली मोर्चे बांधणी तसेच बुथ स्तरावर कार्यकर्त्यांचा जनसंपर्क यामुळे अशोक नेते हेच या लोकसभेत तिसऱ्यांदा निवडून येतील अशी ही चर्चा बऱ्याच अंशी दिसते आहे. तर दुसरीकडे डॉक्टर नामदेवराव कीरसान हे दांडगा जनसंपर्क व महाविकास आघाडीतील सहकारी पक्ष्यांची मदत यामुळे या लोकसभेत बाजी मारतील अशी चर्चा काही मतदारांमध्ये दिसून येत आहे.

एकूणच गडचिरोली चिमूर या लोकसभा मतदारसंघात खरी लढत ही भारतीय राष्ट्रीय काँग्रेस विरुद्ध भारतीय जनता पक्ष यांच्या उमेदवारांमध्येच होणार असेच चित्र सध्या तरी दिसून येत आहे. तरीही या क्षेत्रामध्ये विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले प्रश्न सोडवणाऱ्याकडेच मतदारांचा कल दिसून येत असला तरीही येणाऱ्या काळात आणि प्रचाराच्या रणधुमाळी मध्ये कोण कोणावरती वरचढ ठरेल आणि कोणत्या पक्षाचे पारडे जड व कोणत्या पक्षाचे हलके हे निश्चितच दिसून येणार आहे.

# नागपूरमध्ये बनावट लग्न लावून पैसे उकळणाऱ्या टोळीचा पर्दाफाश;चार आरोपींना अटक

**नागपूर । वृत्तसंस्था**

पैसे घेऊन लग्न लावून देणाऱ्या टोळीचा नागपूर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. ही टोळी वराकडून ५० हजार रुपये घ्यायची. त्यानंतर या टोळीमधील एका मुलीला वधू बनवण्यात येत होते.ही वधू लग्नानंतर दुसऱ्याच दिवशी वराच्या घरून पळून जायची. याप्रकरणी तक्रार दाखल होताच ग्रामीण पोलिसांनी सापळा रचून चार आरोपींना अटक केली आहे.

नागपूरमधील मौदा तालुक्यातील वाळकेश्वर गावातील मनोहर मेश्राम यांच्या मुलाचे नुकतेच लग्न झाले होते. त्यानंतर त्यांची फसवणूक झाल्याचे समोर आले. वधूने मेश्राम यांचा मुलगा प्रवीण याच्याशी २ फेब्रुवारी रोजी लग्न केले होते. त्याबदल्यात, मेश्राम कुटुंबीयांकडून त्यांनी ५० हजार रुपये घेतले होते. लग्नाच्या दुसऱ्या दिवशी वधू बेपत्ता झाली. मेश्राम कुटुंबीयांनी वधूची आई सीमा यांना याबाबत विचारणा केली असता त्यांच्याकडून फोन उचलण्यात आला नाही. यानंतर मेश्राम कुटुंबाला फसवणूक झाल्याचा संशय आला. यानंतर



चौकशी केली असता त्यांनी इतर लोकांचीही फसवणूक केल्याची माहिती समोर आली.

त्यानंतर मेश्राम कुटुंबीयांनी पोलिसांकडे तक्रार दाखल करत कारवाईची मागणी केली. या टोळीला पकडण्यासाठी पोलिसांनी सापळा रचला. पोलिसांनी सीमा यांनी एक कुटुंब लग्नासाठी वधूच्या शोधात असल्याचे सांगितले. यानंतर पोलिसांनी लावलेल्या सापळ्यात हे आरोपी अडकले. पोलिसांनी वधू सोनूसह सीमा आणि अन्य दोन साथीदारांना अटक केली आहे.

# २०० कोटींची खंडणी मागणाऱ्या व्यावसायिक बंधुंवर पोलिसांची कारवाई

**नागपूर । वृत्तसंस्था**

बांधकाम कंपनीत गुंतवणूक करीत, तारण म्हणून ठेवलेल्या विविध मालमत्तांच्या कागदपत्रांचा गैरवापर करीत कंपनीच्या संचालकाला २०० कोटींची खंडणी मागणाऱ्या व्यावसायिक बंधुंवर सदर पोलिसांनी कारवाई केली आहे.याप्रकरणी जयप्रकाश गुरुदासमल खुशलानी (वय ५७, रा.बैरामजी टाउन) यांच्या तक्रारीवरून दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून महेश चंद्रभान किंगराणी, राजेश चंद्रभान किंगराणी (रा. शिवाजीनगर, धरमपेठ) अशी आरोपींची नावे आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जयप्रकाश खुशलानी हे परदेसी कन्स्ट्रक्शन, जेपी हाऊसिंग प्रा. लि., जेपीके सन्स, जेपी रिलिटीज अशा विविध जेपी ग्रुपमध्ये संचालक आहेत. महेश आणि राजेश यांनी २०१९ मध्ये त्यांच्या विविध फर्ममध्ये १० कोटी ३९ लाख ९० हजारांची गुंतवणूक केली.

त्यापैकी त्यांना कंपनीच्या वतीने १ कोटी २० लाख ३० हजार रुपये परत करण्यात आले. याशिवाय उर्वरित ९ कोटी १९ लाख ६० हजारांच्या रकमेसाठी कडबी चौक आणि नंदनवन येथील जागेसाठी तारण म्हणून विकण्यासाठी करार करण्यात आला. त्याची कायदेशीर प्रक्रियाही केली होती. २०२० मध्ये किंगराणी बंधुंनी अधिक रक्कम गुंतविण्याची इच्छा व्यक्त केल्याने त्यांना तारण म्हणून बोकारा परिसरातील जमिनीचाही विक्री करार करून देण्यात आला. त्यानंतर खुशलानी आणि किंगराणी यांनी करार करीत, प्रकल्पातून खुशलानी यांना २५ कोटी आणि ५० टक्के प्रकल्पाच्या बांधकामाचा खर्च आणि नफ्यातील ५० टक्के देण्याचे मान्य केले.मात्र, २०२१ मध्ये त्यांनी कडबी चौक आणि नंदनवन येथे सुरू असलेल्या प्रकल्पात नफा नसल्याचे कारण देत, नवा करार केला. त्यावर धमकी देत, स्वाक्षरी करून घेत, त्याची कागदपत्रे आपल्याकडेच ठेवून घेतली. त्यात मनाप्रमाणे बदल करून घेत, १६ कोटी ६५ लाख ७ हजार ५०० रुपये आपल्याकडे वळतेही केले. याशिवाय नंदनवन येथील प्रकल्पाची रक्कम गड्डीगोदाम आणि बोकारा येथे मालमत्ता खरेदीसाठी लावली. याच दरम्यान त्यांनी नंदनवन प्रकल्प निर्णायक टप्प्यात असतानाही तो बंद पाडून त्यात गुंतवणुकीसाठी मनाई केली. याशिवाय आत्तापर्यंत गुंतविलेले पैसे न देता, दोनशे कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी केली.विशेष म्हणजे, तारण असलेल्या जमिनीच्या कागदपत्रांच्या गैरवापर करीत, त्यांनी न्यायालयात प्रकरण नेले. त्यापूर्वी त्यांनी तिन्ही जागांची स्वतःच्या नावाने सेल डीड तयार केली, यावरून फसवणूक केल्याचे समोर आले. याबाबत त्यांची भेट घेऊन गुंतविलेले पैसे व्याजासह परत देऊन तारण ठेवलेल्या जमिनी परत करण्याची मागणी केली. मात्र, आरोपींनी २०० कोटी रुपयाची खंडणी मागून ते न दिल्यास सर्व जमिनीच्या कागदपत्रांचा गैरवापर करण्याची धमकी दिली. त्यावरून आर्थिक गुन्हे शाखेकडे तक्रार केल्यावर त्यांनी तपासणी करीत, सदर पोलिस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .